पुढारी

महत्त्वाचे




# अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेडच्या २५०० कर्मचाऱ्यांतर्फे कपड्यांचे वाटप

**मुंबई :** कर्मचारी सहभाग उपक्रमाअंतर्गत एईएमएलने आपल्या सर्व विभागांतील कर्मचाऱ्यांना चांगल्या स्थितीतील जुने कपडे जमविण्याचे आवाहन केले होते. समुदाय सहभाग उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यात २५००हून अधिक कर्मचाऱ्यांनी गरजूंना कपड्यांचे वाटप केले. वंचित घटकांना मदत करण्याच्या उद्देशाने एईएमएलने हे कपडे आपल्या वितरण क्षेत्रातील विविध समुदायांमध्ये वाटले. यामध्ये बोरिवली राष्ट्रीय उद्यानाच्या परिसरातील तुमनीपाडा आणि चुनापाडा परिसरात कपड्यांचे वाटप करण्यात आले.कपडे गोळा करण्याच्या मोहिमेमध्ये एईएमएलच्या टीमने कपड्यांनी भरलेली ७०हून अधिक बॉक्स जमवले होते. त्यापैकी काही कपडे त्या त्या वस्त्यांमध्ये राहणाऱ्या लोकांना दिले. जेणेकरून या भागांमध्ये राहणाऱ्या जास्तीत-जास्त लोकांना याचा फायदा मिळेल आणि त्यांच्या मुलभूत गरजा पूर्ण होतील. कर्मचाऱ्यांना प्रतिसादाची प्रेरणा देत ही मोहीम दरवर्षी घेण्याचा एईएमएलचा विचार आहे. त्यामुळे वंचित घटकांपर्यंत अत्यावश्यक वस्तू पोहचवणे शक्य होईल.